तक्रार युएलपी क्र.२१/२०२४
निशाणी क्रं. सी–१२

**तक्रारदारातर्फे ॲड. श्री.बी.डी.मनोळकर यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार हे १५/०५/२०१८ रोजी नोकरीस लागले. तक्रारदार हे सुरूवातीस मुख्य कार्यालयात मार्केटींग विभागात सहाय्यक अधिकारी या पदावर कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, ०९/०७/२०२२ पासून त्यांची बदली पशू खाद्य कारखान्यात केली. तक्रारदार हे दिनांक ०८/०७/२०२२ पर्यंत मुख्य कार्यालयात मार्केटींग विभागातच कार्यरत होते. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार यांचे पशू खाद्य विभागात कामकाजाचे स्वरूप कारकुनी स्वरूपाचे होते. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यास कर्मचा–यांना नोटीस, मेमो अथवा ताकीत देण्याचे प्रशासकीय व व्यवस्थापकीय अधिकार नव्हते. मी आजही व्यवस्थापक म्हणून पशू खाद्य विभागात कार्यरत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, पशूखाद्य दुध पुरवठा करणा–या संस्थेच्या मागणीप्रमाणे पुरवठा केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, पशू खाद्य पुरवठा करण्याकरीता वाहतूक ठेकेदाराची नेमणूक प्रशासनाने केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, राधानगरी तालूका सहकारी वाहतूक संस्था मर्या. घोटवडे ही एक वाहतूक ठेकेदार संस्था आहे. हे म्हणणे खरे आहे की, पशू खाद्य मार्केटींग मध्ये शुभम भोसले क्लर्क म्हणून कार्यरत होते.हे म्हणणे खरे आहे की, डिलीव्हरी चलन २ ते ३ प्रतीत मार्केटींक विभागात तयार केले जाते.एक चलन गोडावून मध्ये माल भरण्याकरीता दिले जाते दुसरी प्रत संबंधीत वाहनाच्या चालकाकडे दिली जाते. तीसरी प्रत प्रशासनाकडे ठेवली जाते. हे म्हणणे खरे आहे की, संबंधीत वाहन चालक माल पोहोच झाल्याची पावती गोडावून क्लर्ककडे जमा करतो. हे म्हणणे खरे आहे की, संबंधीत संघास माल पोहोच झाल्यानंतर दर १५ दिवसांचे बिल संबंधीत संस्था संघाकडे मागणी करते. हे म्हणणे खरे आहे की, महिन्यातून दोन वाहतूक बीले जमा केली जातात. हे म्हणणे खरे आहे की, वाहतूक बील मार्केटींक विभागातील संबंधीत क्लर्क शुभम भोसले यांच्याकडे जमा केले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, शुभम भोसले हे मागणी बील, वाहतूकीचे टप्पे आणि किलोमीटरची खात्री करून संगणकावर त्याची समरी तयार करत होते. हे म्हणणे

खरे आहे की, संबंधीत वाहतूकदाराची मागणी बीले आणि त्या अनुषंगीक कागदपत्रांचा ताबा शुभम भोसले यांच्याकडे होते.

दोन्ही विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/—**

कोल्हापूर. ( के. बी. कामगौडा )
दिनांकः—१७/१२/२०२५ न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. २ कोल्हापूर.